**राज्यामधील रोपवेची कामे कार्यान्वित करणेकरीता नवीन लेखाशीर्ष निर्माण करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन निर्णय क्र.रोपवे- २०२६/प्र.क्र.३४/नियो-१अ**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- २२ ऑक्टोबर, २०२६

**<u>वाचा</u> :-** सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.रोपवे २०२२/प्र.क्र.२७/नियो-१अ, दि.१९.०३.२०२५

**<u>प्रस्तावना:-</u>**

केंद्र शासनाच्या रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाकडून २०२२-२३ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "राष्ट्रीय रोप-वे कार्यक्रम-पर्वतमाला' ची घोषणा करण्यात आली आहे. सदरील कार्यक्रमांतर्गत डोंगराळ प्रदेश, शहरातील अतिगर्दीची ठिकाणे, दुर्गम भागांना रोप-वे द्वारा जोडण्यात येणार आहे. यामुळे राज्यातील पर्यटन व धार्मिक स्थळांचे महत्त्व वाढून पर्यटनास चालना मिळणार आहे. तसेच 'पर्वतमाला' योजनेअंतर्गत राज्यातील हवाई रज्जुमार्ग प्रकल्प (रोपवे) च्या कामाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या M/s. NHLML व राज्य शासन यांचेमध्ये दि.०३.०२.२०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १८.०२.२०२५ रोजीच्या बैठकीत केंद्र शासनाच्या 'पर्वतमाला' योजनेंतर्गत राज्यातील रोपवेची कामे राष्ट्रीय राजमार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लि.(NHLML) मार्फत कार्यान्वित करणेकरीता NHLML ला आवश्यक State Support उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने पर्वतमाला योजनेंतर्गत राज्यातील रोपवे ची कामे NHLML मार्फत Equity Support (भागभांडवली सहाय्य) व जागा उपलब्ध करून देणे या दोन पर्यायांवर कार्यान्वित करणेबाबत वाचा येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

सबब, रोपवेची कामे कार्यान्वित करणेकरीता निधीची तरतूद करणे व वितरीत करणे या प्रयोजनासाठी नवीन लेखाशीर्ष निर्माण करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

'रोपवेची कामे कार्यान्वित करणे' या योजनेसाठी खालीलप्रमाणे नवीन लेखाशीर्ष निर्माण करण्यात शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| **मागणी क्रमांक एच-७** | | | **Demand no. H-7** |
|---|---|---|---|
| ५०५४ | मार्ग व पुल यावरील भांडवली खर्च | 5054 | Capital Outlay on Roads and Bridges |
| ८० | सर्वसाधारण | 80 | General |
| ८०० | इतर खर्च | 800 | Other Expenses |
| ०१ | रोपवेची बांधकामे | (01) | Ropeway Works |
| (०१)(०१) | राज्यातील रोपवेची कामे कार्यान्वित करणेकरीता निधीची तरतूद (कार्यक्रम) (५०५४ ५६०९) | (01)(01) | Budget Provision for Ropeway works in state (Scheme) (5054 5609) |
| ५३, | मोठी बांधकामे. | 53, | Major Works |

प्रस्तुत योजनेकरीता संबंधित अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ यांची नियंत्रक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या अनौपचारिक स.क्र.१०/अर्थ-१२, दि.१३.०३.२०२६ व महालेखाकार, नागपूर कार्यालयाचे पत्र क्र. TM/GR.III/UOR-०५/Sub-head/२०२६-२७/२५३ दि.०२.०६.२०२६ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१०२२१५३०४३४२१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by AJIT DATTATRAYA KATKAR
Date: 2026.10.22 15:31:37 +05'30'

**(अजित काटकर)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उप मुख्यमंत्री (नगरविकास, गृहनिर्माण, सा.बां.(सा.उ.)) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उप मुख्यमंत्री (राउशु ,क्रीडा व युवक कल्याण,अल्पसंख्याक) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

६. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. सर्व सह सचिव/ उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग
१५. सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ
१६. निवडनस्ती- कार्यासन (नियोजन-१अ)